REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# विदर्भाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि विदर्भातील श्रमिक संघटना एक दृष्टीक्षेप



डॉ. वैशाली रूईकर
वाणिज्य विभाग,
नबिरा महाविद्यालय, काटोल

## प्रस्तावना

*''यत् क्षेम त्रिदिवाय वर्त्म निगमस्यांगैश्च यत् सप्तमं*
*स्वादिष्ट च यदैक्षवापिरसात चक्षुश्च यद् वाङ्मयम्*
*तद् यास्मिन् मधुरप्रसादिरसवत् कान्तं च काव्यामृतं*
*सोयं सृभ्रु पुरो विदर्भ विषयः सारस्वती जन्मभूः''*

राजशेखराच्या बाळ रामायणातील या ओळींमधून आलेला विदर्भाचा उल्लेख समस्त वैदर्भीयांना सुखावणारा आहे. विदर्भातील लोक किती प्रज्ञावंत आणि बुद्धिवंत आहेत, याचा हा प्राचीन आणि तेवढाच प्रतिभावंत दाखला आहे. राजशेखरांखेरीज कालीदास, भवभूतींसारख्या दिग्गजांची ही भूमी आहे. स्पृश्यास्पृश्य भेद मिटवून समानतेचे साहित्य देणाऱ्या श्री गोविंद प्रभूंच्या वास्तव्याने विदर्भातील रिद्धपूरचा परिसर पुनीत झाला आहे. अशा अनेक स्फूर्ती–स्थळांच्या प्रेरणेने विदर्भाची वाटचाल समृद्ध केली आहे. तुकडोजी, गाडगेमहाराजांसारख्या समाजसुधारकांची कर्मभूमी विदर्भात आहे. स्वातंत्र्यकाळात या भूमीने गांधी–विनोबांच्या सेवाकार्याचा गंध अनुभवला. नंतरच्या काळात आमटे, बंग या आधुनिक साधकांचे परिश्रम ही बघितले भारत कृषक समाजाची स्थापना करणारे डॉ. पंजाबराव देशमुख यांच भूमीची देण होते. तसेच देशाला परममहासंगणक देणारे डॉ. विजय भटकर याच भूमीचे पुत्र आाहेत.

महाराष्ट्र राज्याची सुमारे २० टक्के लोकसंख्या विदर्भाच्या अकरा जिल्हयात सामावली आहे. राज्याचा मागसलेला भाग म्हणून ओळखला जाणारा विदर्भ पुन्हा समृद्धीच्या मार्गावर आहे.

महात्मा गांधीनी वर्ध्याजवळ सेवाग्रामला आणि विनोबांनी पवनारला आश्रम निर्माण करुन आपले देशसेवेचे कार्य केले. त्या कार्याचा सुगंध अजून तेथील मातीला येतो. बाबा आमटेंनी वरोरा (आनंदवन) येथे, डॉ. राणी व डॉ. अभय बंग हयांनी गडचिरोली येथे आणि डॉ. प्रकाश आमटेंनी गडचिरोली जिल्हयातील भामरागड येथे, ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात सेवा व आरोग्य संशोधन कार्य चालू ठेवले आहे. त्यास आंतरराष्ट्रीय प्रशंसा मिळाली आहे.

## संशोधनाची उद्दिष्टये

- **विदर्भाची ऐतिहासिक पार्श्वभूमी जानुन घेने.**
- **विदर्भाचे आर्थिक जीवन अभ्यासने.**
- **विदर्भातील आर्थिक जीवन आणि विदर्भातील मानव संसाधन यातील परस्पर संबंध जानुन घेने.**
- **विदर्भातील श्रमिक संघटना एक दृष्टीक्षेप अभ्यासने.**
- **कामगार संघटनाच्या संघर्षाचे महत्वपूर्ण पैलू अभ्यासने.**

## विदर्भाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सांस्कृतिक वैभव

विदर्भाला अतिशय प्राचीन इतिहास लाभला आहे. विदर्भावर वाकाटक, चालुक्य, यादव, मोगल, निजाम यांनी वर्षानुवर्षे राज्य केले आहे. यापूर्वीचा इतिहासही मनमोहित करणारा व विदर्भवासियांना प्रेरणादायी असा आहे. सर्व विश्व व्यापून टाकणारा दुष्टांचा नाश करुन सज्जनांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देऊन त्यांना हक्क मिळवून देणारा जगत्पालक श्री विष्णूचा अवतार म्हणजे श्रीकृष्ण. या श्रीकृष्णाची पट्टराणी रुक्मिणी ही विदर्भाची राजकन्या. नल—दमयंती या राजा—राणीची प्रेमपूर्ण कथाही विदर्भाच्या समृद्धतेची साक्ष देतात. दमयंती ही सुद्धा विदर्भातीलच. शिव छत्रपती शिवाजी राजांच्या मातोश्री जिजाऊ मासाहेब विदर्भातील सिंदखेड राजा येथील राजे लखुजी जाधव यांच्या सुपुत्री होत.

बौद्ध संस्कृतीचा प्रसार नागपूर भंडारा जिल्हयांमध्ये विशेषत्वाने दिसून येतो. भंडाऱ्यातील पवनी येथील प्रसिद्ध स्तूप व इतर स्मारके त्याची साक्ष देतात. रामटेक येथील नागार्जुन टेकडया बौद्ध संस्कृतीच्या खुणा दर्शवितात. गडचिरोली जिल्हयात मार्कंडा येथील शिवमंदीर व चंद्रपूर येथील महाकाली देवीचे मंदिर ही केवळ येथीलच नाही तर शेजारच्या मराठवाडयााच्या व तेलंगणाच्या लोकांचीही दैवते आहेत. स्त्री पुरुषांना समान प्रतिष्ठा देणारा आणि प्राचीन काळी सगळयात पुरोगामी असलेला महानुभाव पंथ विदर्भातच निर्माण झाला. चंद्रपूरातील भद्रावती, नागपूर जिल्हातील रामटेक येथील टेकडयांमध्ये, अमरावती जिल्हयातील मालेगाव येथील प्रसिद्ध जैन मंदिरे विदर्भातील जैन संस्कृतीच्या विकासाच्या खुणा दर्शवितात. वाशिम ही वाकाटकांच्या संपन्न राज्याची राजधानी होती. प्रसिद्ध कवी राजशेखर हा वाशिमचाच वाशिम जिल्हयातील कारंजा नृसिंह सरस्वती मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. अमरावतीला अंबा मंदिर प्रसिद्ध आहे. मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ग्राम उत्थानाचा संदेश देणारा आश्रम आहे. माधान येथे प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराजांचा आश्रम आाहे. मुर्तिजापूर येथे संत गाडगेबाबांचा समता, स्वच्छता आणि विवेक हयांचा संदेश देणारा आश्रम आहे. शेगावला प्रसिद्ध गजानन महाराज मंदिर आहे. बुलढाणा हे आद्य वैदर्भीय स्त्रीवादी लेखिका ताराबाई शिदेंचे गाव आहे, लागून देऊळगावराजा येथे बाळाजीचे स्थान आहे. तर विदर्भाच्या दक्षिण —पश्चिम टोकावर सिंदखेड राजा हे शिवाजींच्या आई राजमाता जिजाऊचे माहेर आहे.

गोंड राजांनी (चंद्रपूरपासून छिंदवाडयापर्यंत पसरलेल्या) गोंड राज्यांची राजधानी म्हणून इ.स. १७०३ मध्ये नागपूर शहर वसविले. नंतर गोंड राणीने नागपूर प्रदेश रघुजी राजे भोसलेंना बक्षीस दिल्यावर नागपूर ही भोसल्यांची राजधानी बनली. रघुजी दुसरे हयांनी नागपूर शहराच्या आसपास बागा, तलावे इत्यादी निर्माण करुन शहर सुंदर बनविले. भोसल्यांकडून ब्रिटिशांना नागपूर प्रांत मिळविल्यावर त्यांनी नागपूरला मध्यप्रदेशाची राजधानी बनविले. नंतर त्या प्रांताला वऱ्हाड जोडला.

प्रामुख्याने वऱ्हाडच्या जिल्हांत डॉ. पंजाबराव देशमुखांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या उत्थानाकरिता अमरावती हे शहर केंद्रस्थानी ठेवून शिवाजी शिक्षण संस्थेच्या रुपाने आणि सेवाभावाने शिक्षण संस्थांचे जाळे विणले. शिवाजीराव पटवर्धनांनी आपला कुष्ठरोग्यांसाठीचा तपोवन आश्रम अमरावतीत चालविला आणि जगप्रसिद्ध हनुमान व्यायाम प्रसारक मंडळही मोठया निष्ठेने अमरावतीतच चालविले जात आहे.

गोंदिया जिल्हयात आमगावजवळ संस्कृत साहित्यातील अजरामर कवी भवभूतीचे वसतीस्थान आहे नागपूर जिल्हयात रामटेकला महाकवी कालिदासाचे वास्तव्य होते. भंडारा जिल्हयात पवनी जवळ अंभोरा येथे आद्य कवी मुकुंदराजाने मराठीतील पहिला ग्रंथ 'विवेकसिंधु' संपन्न केला. त्यांची समाधी मराठवाडयात अंबाजोगाई येथे आहे.

१९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्माची दिक्षा घेतली. ते स्थळ आता भव्य आणि प्रेक्षणीय स्तूपास दीक्षाभूमी म्हणून जागतिक प्रसिद्धी प्राप्त आहे.

आधुनिक काळातील साहित्यिकांत पु. भा. भावे, ना. घ. देशपांडे, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, वीर वामनराव जोशी, बापूजी अणे, विद्याधर गोखले, कवि आ. रा. देशपांडे व डॉ. कुसुमावती देशपांडे, सुरेश भट, महेश एलकुंचवार, डॉ. यशवंत मनोहर, सुधाकर गायधनी, राम शेवाळकर, शरदचंद्र मुक्तीबोध, नाटयलेखक — दिग्दर्शक पुरुषोत्तम दारव्हेकर, विठ्ठल वाघ, सदानंद देशमुख, लोकनाथ यशवंत, अशोक पवार, कवि ग्रेस, वसंत आबाजी डहाके, भास्कर लक्ष्मण भोळे व अनेकांनी विदर्भाच्या साहित्यभूमीवर आपला ठसा उमटविलेला आहे. डॉ. वसंतराव देशपांडे ही देखील विदर्भाचीच देणगी. लोकभाषेवर व झाडीबोलीवर उल्लेखनीय कार्य करणारे डॉ. हरिश्चंद्र बोरकर देखील विदर्भाचेच.

महात्मा गांधीनी वर्ध्याजवळ सेवाग्रामला आणि विनोबांनी पवनारला आश्रम निर्माण करुन आपले देशसेवेचे कार्य केले. त्या कार्याचा सुगंध अजून तेथील मातीला येतो. बाबा आमटेंनी वरोरा (आनंदवन) येथे, डॉ. राणी व डॉ. अभय बंग हयांनी गडचिरोली येथे आणि डॉ. प्रकाश आमटेंनी गडचिरोली जिल्हयातील भामरागड येथे, ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात सेवा व आरोग्य संशोधन कार्य चालू ठेवले आहे. त्यास आंतरराष्ट्रीय प्रशंसा मिळाली आहे.

## विदर्भाची भौगोलिक स्थिती भौगोलिक महत्त्व

विदर्भाच्या उत्तरेला सातपुडा पर्वत पसरला आहे. यातून पूर्णा नदी उगम पावली आहे. उत्तर विदर्भाला मेळघाट वा पाईनघाट असे म्हणतात. विदर्भाच्या दक्षिण सीमेवर पैनगंगा नदी वाहत आहे. राजकीय दृष्टया विदर्भाच्या उत्तरेकडे व पूर्वेकडे मध्यप्रदेश व छत्तिसगढ ही राज्ये आहेत. दक्षिणेकडे परभणी व नांदेड हे जिल्हे असून आंध्रप्रदेश हे राज्य आाहे. पश्चिमेकडे औरंगाबाद, जालना व जळगाव (खानदेश) हे जिल्हे आहेत. विदर्भाची पूर्व पश्चिम लांबी अंदाजे ४५० किलो मीटर आहे. तर उत्तर–दक्षिण ऊंची (रुंदी) जवळपास २०० किलोमीटर आहे.

विदर्भाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे हा भूभाग दक्षिण व उत्तर भारताच्या मध्ये आहे. या भौगोलिक परिस्थितीमुळे भारताच्या राजकारणात त्याचे आगळे वेगळे स्थान आहे. प्राचीन काळी आर्यवर्त व दक्खन यांना जोडण्याचे काम विदर्भानेच केले आहे.

धनधान्याच्या दृष्टीने हा सुपीक प्रदेश आहे. विदर्भाच्या भूगर्भात खनिजसंपत्ती दडलेली आाहे. दगडी कोळसा, लोखंड व मॅगनीज यांचे भरपूर साठे आहेत. विदर्भाचा बहुतांश भाग जंगलानी व्यापलेला आहे. बांबू तेंदूपत्ते व सागवाणाची जंगले देखील आहे. असा हा विदर्भ संपन्न व समृद्ध आहे, म्हणूनच अनेक राजसत्तानी यावर आक्रमणे केली. आणि या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी येथे प्रमुख राजघराणी उदयास आली.

## विदर्भाचे आर्थिक जीवन

विदर्भ हा कृषी प्रधान प्रदेश आहे. कारण येथील ७२% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. विदर्भातील एकूण शेती १,०८२,००० एकर आहे. पण त्यात ओलीत भाग फक्त ६३३००० एकर इतकीच आहे. विदर्भातील सहा जिल्हयात ज्वारी व गहू यांची पिके चांगली होतात भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली हे जिल्हे तांदळाच्या पिकासाठी प्रसिद्ध आहे.

विदर्भात एक असे पीक काढण्यात आले की ज्यामुळे विदर्भाचा कायापालट झाला. ते पीक म्हणजे कापूस कापूस. हा विदर्भाच्या सुरुवातीच्या आर्थिक विकासासाठी वरदान ठरला. त्यामुळे विदर्भात जिनिंग – प्रेस कापड गिरण्या, विणकर हातमाग उद्योग अस्तित्वात आले. विदर्भात कापसाच्या उद्योगासोबतच संत्र्याचा उद्योग देखील प्रसिद्ध आहे. विदर्भातील संत्र्याची निर्यात संपूर्ण देशात आणि विदेशात केली जाते.

विदर्भात कापूस व संत्री याशिवाय मिरची – लाल व हिरव्या दोन्ही मिरच्यांचा वापर विदर्भात भरपूर होतो. म्हणून प्रत्येकच जिल्हयातील प्रत्येक गावात मिरचीचे पीक घेतले जातात. तसेच वर्तमान काळात विदर्भात सोयाबिन च्या वाढत्या मागणीनुसार सोयाबिनचे पिके देखील घेतली जातात.

विदर्भाच्या भूगर्भात खनिज संपत्तीचे साठे आहेत. भंडारा जिल्हयात मॅगनीज व लोखंडाचे साठे आढळतात तर चंद्रपूर, काही प्रमाणात नागपूर जिल्हा हे कोळशाच्या खाणीसाठी प्रसिद्ध आहे.

## विदर्भातील आर्थिक जीवन आणि विदर्भातील मानव संसाधन यातील परस्पर संबंध

कोणत्याही भौगोलिक क्षेत्रातील आर्थिक बाबी हया त्या क्षेत्रातील मानव व मानवीय क्रियाशी निगडीत असते. मानवाच्या प्रत्येक क्रिया या अर्थ प्राप्तीशी निगडीत असतात. म्हणून मानव संसाधन म्हणजेच मानवाच्या अंगी असलेले ज्ञान, कौशल्य व योग्यता ज्याचा उपयोग ते अर्थार्जनासाठी करीत असतात. आर्थिक जीवन किंवा अर्थव्यवस्था ही मानवाच्या अर्थप्राप्तीच्या प्रक्रियांनीच युक्त आहे.

उपलब्ध संसाधनामध्ये मानवसंसाधन हे महत्वाचे संसाधन आहे. मानवी गरजा भागविण्यासाठी ज्या वस्तू आणि सेवांची निर्मिती होते त्यामध्ये मानव संसाधनाचा सहभाग हा महत्वपूर्ण असतो. हा सहभाग श्रमाच्या (Labour) स्वरुपात असतो. मग त्याची मात्रा, अवधी, आणि प्रकार (शारीरिक आणि बौद्धिक श्रम) कोणत्याही स्वरुपाचे असो आणि या उत्पादित वस्तू आणि सेवा यांचा उपयोग माणसांसाठीच त्यांच्या गरजा भागविण्यासाठी असतो. या दुहेरी भूमिकेमुळे कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा मापदंड माणसाचा जीवनस्तर असतो. ज्याला आपण समाज व्यवस्थेचा एक भाग म्हणतो. म्हणूनच आर्थिक जीवन व मानवसंसाधन यामध्ये परस्पर संबंध आहे असे निदर्शनास येते.

अर्थव्यवस्था ही एक तऱ्हेची सामाजिक व्यवस्था असते. ज्यामध्ये समाजातील सर्व व्यक्तींना आपल्या आर्थिक क्रिया, आर्थिक व्यवहार एका विशिष्ट तऱ्हेने करता येतात. ज्याला आपण आर्थिक जीवन असे देखील म्हणतो. आर्थिक व्यवहार या सर्वसमावेशक शब्दात व्यक्तीची उपजीविका करुन उत्पन्न मिळवणे, आपल्या गरजाच्या तृप्तीसाठी आर्थिक वस्तू प्राप्त करुन त्यांचा उपयोग करणे, आपले भौतिक कल्याण साधण्यासाठी प्रयत्न करणे, वस्तूच्या किंमतीच्या आधाराने खरेदी–विक्री करणे, उत्पादन

कार्यात उत्पादन घटक म्हणून सहभागी होणे, भविष्यकालीन गरजांच्या पूर्ततेसाठी तरतूद करणे, विशिष्ट वस्तूसंच उपयोगासाठी वापरणे, आपली उत्पादन घटक म्हणून क्षमता व किंमत वाढवणे, आपले उत्पन्न विविध प्रकारे वाढविणे इत्यादी क्रिया आर्थिक जीवनाचा महत्त्वपूर्ण भाग आहे.

## विदर्भातील मानव संसाधन एक दृष्टीक्षेप

मानवाच्या विकासाची क्षमता वाढविण्यासाठी त्याला आवश्यक तेवढे उत्पन्न मिळाले पाहिजे. प्रत्येकाला शिक्षण, आरोग्य, मुलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजे. विशेषत: संयुक्त राष्ट्र संघाच्या निर्देशानुसार मानवाचा विकास ही निवडीच्या विस्ताराची प्रक्रिया आहे. यासाठी समाजातील सर्वसामान्य लोकांना कल्याणाची साधने उपलब्ध करून देण्यावर अधिक भर दिला पाहिजे. सामान्यपणे मानव संसाधनांचा संबंध हा देशातील लोकसंख्या, त्यांचे शिक्षण, त्यांच्यातील कौशल्य आणि त्यांचे प्रशिक्षण या बाबींशी निगडीत असते. कारण देशाचा आर्थिक विकास हा मानव संसाधनाच्या विकासाशी निगडीत असतो. त्यामुळे आर्थिक विकासासाठी ''मानव भांडवल'' (Human Capital) निर्माण करण्याची प्रक्रिया ही अत्यंत महत्वाची आहे.

प्रत्येक देशातील, राज्यातील किंवा विशिष्ट प्रदेशातील मानव हा विकासाचा केंद्र बिंदू आहे. तर मानव संसाधन ही त्या देशाच्या अर्थव्यवस्थेतील एक प्रभावी शक्ती समजली जाते. त्यादृष्टीने विदर्भातील मानव संसाधनावर दृष्टीक्षेप टाकतांना लोकसंख्या, रोजगार आणि शिक्षण याबाबत पैलूंचा आढावा विचारात घेऊ. मानव संसाधन विकासासाठी रोजगार उपलब्ध होणे आवश्यक आहे. विकसनशील देशात बेकारीची समस्या मोठया प्रमाणात अस्तित्वात आहे. बेकारीची समस्या असताना संपूर्ण मानव संसाधनाचा पाहिजे त्या प्रमाणात उपयोग होत नाही ते एक प्रकारे निष्क्रीय राहते. बेकारीच्या गंभीर अवस्थेत जीवनावश्यक गरजांची पूर्तता करता येत नाही. त्याचा संबधीत व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक कार्यक्षमतेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. विदर्भातील कामकरी वर्गाचा आणखी एका अंगाने विचार करावा लागतो. तो म्हणजे कोणत्या क्षेत्रात हा कामकरी वर्ग किती प्रमाणात काम करीत आहे. अर्थव्यवस्थेमध्ये अर्थार्जनासाठी तीन प्रमुख विभाग मानली जातात, प्राथमिक क्षेत्र (Primary sector), दुय्यम क्षेत्र (secondary sector) व तिय्यम क्षेत्र (services sector). ही तिन्ही क्षेत्र अनिवार्य आहे. प्राथमिक क्षेत्रात प्रामुख्याने कृषी, खाणकाम, मासेमारी, वनप्रक्रियेची कामे किंवा व्यवसाय येतात. दुय्यम क्षेत्रात सर्व तऱ्हेचे उद्योगधंदे येतात तर तिप्पट क्षेत्रात सर्व तऱ्हेच्या सेवांचा समावेश होतो.

## विदर्भातील श्रमिक संघटना एक दृष्टीक्षेप

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतून येथील कामगार चळवळ आकारास आलेली दिसते. स्वातंत्र्य संग्रामामध्ये राष्ट्राचे स्वातंत्र्य हेच श्रमिक चळवळीचे उद्दिष्ट होते. सोव्हिएत रशियातील कामगार क्रांतीनगर जगभरात क्रांतिकारक उठावांना सुरुवात झाली. कार्ल मार्क्स व लेनिन यांच्या तत्वज्ञान व कार्यातून जगभराच्या कामगार चळवळी स्फूर्ती घेत असतात. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात कामगार चळवळीने खूप मोठे योगदान दिलेले आहे. महाराष्ट्रातील सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील बदलांना काही प्रमाणात चालना देण्याचे काम कामगार चळवळीने केले आहे. कामगार चळवळीचा आढावा घेतल्याशिवाय महाराष्ट्रात आजपर्यंत झालेल्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, व आर्थिक क्षेत्रात झालेल्या बदलांचे व परिवर्तनाचे आकलन आपल्याल खऱ्या अर्थाने होऊ शकणार नाही. यामुळे कामगार चळवळींचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते.

## कामगार चळवळीची वाटचाल

महात्मा फुल्यांचे अनुयायी नारायण मेघाजी लोखंडे यांना भारतातील कामगार चळवळीचे आद्य प्रवर्तक समजले जाते. एम. एस. जोशी, डॉ. एस. ए. डांगे, सी. एस. जोशी इत्यादींनी स्वातंत्र्यपूर्वकाळात कामगार चळवळीचा पाया घातला. विदर्भात मोठया प्रमाणात असणारी खनिज संपत्ती आणि मोठया प्रमाणावर होणारे कापसाचे उत्पादन हयाच ठिकाणाहून विदर्भात कामगार चळवळींना चालना मिळाली. कोळशाच्या खाणीत मजूर काम करीत असताना त्यांच्या काही समस्या असत. त्या सोडविण्यासाठी कोळसा मजुरांनी संघ बनविल जेव्हा मालक व मजूर यांच्यात संघर्ष निर्माण होत असत तेव्हा चंद्रपूरचे सेठ खुशालचंदजी खंजांची हे ते सोडवीत असत.

विदर्भात त्यानंतर जिन–प्रेस, कारखाने व मिल – गिरण्या निर्माण झाल्या. त्याबरोबर मजूरांच्या या संघटना कारखानदारांकडून आपल्या मागण्या पूर्ण करुन घेऊ इच्छित होत्या. राजकीय पक्षाचे पुढारी मजूरांना राष्ट्रीय आंदोलनाात सहभागी करुन घेण्यास व त्यांच्यात असलेल्या मद्याच्या व्यसनापासून मुक्त करविण्याचा प्रयास करु लागले. २६ एप्रिल, १९०८ रोजी नागपूरात मिल मजूरांची एक सभा भरली त्यात डॉ. मुंजे, स्वामी शंकरानन्द, दत्तोपंत ठेंगडी इत्यादी नी 'दारु सोडा व पैसा फडात

पैसा द्या इत्यादी उपदेशात्मक भाषणे दिली. दत्तोपंत ठेंगडी हे विदर्भातील मजुरांचे प्रथम पुढारी होत नागपूरातील दोन्ही मिलांची स्थापना जरी एकोणीसाव्या शतकाच्या आठव्या दशकात झाली असली तरी विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात प्रथमच ठेगंडी यांच्याकडून मजूरांच्या संघटनेचे दर्शन होते. त्यांना नागपूरच्या मजूर आंदोलनाचे जनक म्हणतात. ते नागपूरच्या मॉडेलमिल तर्फे विलायतला गेले होते. तेथे त्यांनी प्रथमच स्वत: मजूरांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. नंतर त्यांनी आपले जावई रामभाऊ रुईकर यांना मजूर – आंदोलनाचे नेतृत्व सोपविले. रुईकरांचे कार्य ई.स. १९२० पासून सुरु होते. त्यांनी मजूर आंदोलनाच्या प्रवाहाला राष्ट्रीय आंदोलनाच्या प्रमुख प्रवाहास जोडून व्यापक राष्ट्रभक्तीच्या भावनेचा परिचय दिला. म्हणून त्यांचे नाव विदर्भाच्या मजूर नेत्यामध्ये प्रसिद्ध झाले.

## कामगार संघटनाच्या संघर्षाचे महत्वपूर्ण पैलू

विविध प्रकारच्या कामगार संघटनाच्या उद्दिष्टांचा अभ्यास केला असता सर्वसाधारणपणे त्यांचे दोन गट पडत असल्याचे दिसते.

- पहिल्या गटात कामगार राज्याची निर्मिती, लोकशाही समाजवादीची स्थापना इत्यादी दीर्घ पल्याच्या राजकीय उद्दिष्टय ठेवणाऱ्या संघटना अंतर्भूत होतात.
- दुसऱ्या गटात कामगार विषयक सरकारी धोरणांना कामगारानुकुल दिशा देणे, कामगार संघटनांना प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे, कामगार वर्गाचे जीवनमान उंचावणे आणि त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावणे. ज्याप्रमाणे कामगार संघटनाच्या उद्दिष्टांच्या आधारे कामगार संघटनांची वर्गवारी करता येते. त्याचप्रमाणे कामगार करत असलेल्या संघर्षाची किंवा लढयांची सुद्धा दोन प्रमुख अंगे असतात.
- मालकाकडून कामगार वर्गाला आर्थिक लाभ व सवलती मिळवून देणे कामगार वर्गाची उत्पादनातील भागीदारी प्रस्थापित करणे आणि कामगारांचे विविध प्रकारच्या शोषणापासून संरक्षण करणे.
- दुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे शासनाशी संघर्ष करुन शासनाला कामगार वर्गाच्या कल्याणासाठी विविध कायदे करायला भाग पाडणे.

स्वातंत्र्योत्तर कामगार चळवळ ही विशेषत: राजकीय पक्षाशी जवळीक असलेल्या कामगार संघटनांनीच नियंत्रीत केल्याचे दिसते. एका अर्थाने विविध राजकीय पक्षांशी संलग्न असलेल्या कामगार संघटनाचे कामगार चळवळीवर वर्चस्व राहिले आहे. त्यामध्ये पुढील पक्षप्रणीत संघटनांचा समावेश होता.

- कॉंग्रेस प्रणीत – इंटक INTUC
- सी.पी. आय. ची संलग्न – आयटक INTUC
- समाजवादी विचारांची समजली जाणारी – हिंदी मजदूर सभा HMS
- सी पी एम शी संलग्न सिट् CTUC
- भारतीय जनता पक्षाशी संलग्न असलेली भारतीय मजदूर संघ BMS
- शिवसेनेची भारतीय कामगार सेना

महाराष्ट्रातील संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा काळ हा कामगार चळवळीच्या वाढत्या वर्चस्वाचा काळ होता. महाराष्ट्रातील कारखानदारी ही प्रामुख्याने मुंबई व तिच्या परिसरात एकवटली होती. विविध औद्योगिक पदार्थाचे उत्पादन करणारे खाजगी कारखाने या ठिकाणी निर्माण झाले. मुंबईनंतर हळूहळू पुणे, नाशिक, औरंगाबाद, ठाणे, हया शहरांमध्ये व आसपास औद्योगिकरण होऊ लागले. परंतु असे असले तरी महाराष्ट्रातील कामगार चळवळीचे मुख्य केंद्र हे खऱ्या अर्थाने मुंबई हेच राहिले.

१९७० नंतर महाराष्ट्रातील चळवळीत गुणात्मक बदल घडून येऊ लागल्याचे दिसते हा फरक म्हणजे कामगार चळवळीतील राजकीय पक्षाच्या कामगार संघटनांची जागा स्वतंत्र कामगार संघटनांनी घेतली डॉ. दत्ता सामंत, जॉर्ज फर्नाडीस, डी. बी. पाटील इत्यादी कामगार नेत्यांच्या नेतृत्वाखाली कामगार संघटना प्रभाव पाडू लागल्या. परंतु १९८० च्या दशकात यांचा प्रभाव ओसरु लागला.

## १९९० च्या औद्योगिक धोरणाचा श्रमिक संघटनांवर परिणाम

१९९० नंतर जागतिकीकरण, उदारीकरण, आणि खाजगीकरण या धोरणामुळे देशतील व पर्यायाने महाराष्ट्र, विदर्भ यासारख्या भागात सुद्धा कामगार चळवळीसमोर विविध आव्हाने निर्माण झालेली दिसून येतात. आज भारतातील कामगार चळवळीपुढे

फार मोठी आव्हाने उभी राहिली आहेत. स्वातंत्र्याच्या काळात असलेली कामगार संघटनांची प्रभावी शक्ती आज क्षीण झालेली दिसते याला पुढील काही परिस्थिती कारणीभूत ठरते.

- कामगार संघटनांमध्ये असलेला एकजुटीचा अभाव
- तंत्रविज्ञानातील बदल व भांडवलाचे जागतिकीकरण
- भारतातील उत्पादन पद्धतीचे स्वरुप
- कामगार संघटनांची दुबळी प्रचार यंत्रणा
- विधिमंडळातील कामगार आघाडीचा अभाव

**जागतिकीकरण**—उदारीकरणाने निर्माण केलेल्या या आव्हानांस श्रमिक संघटना कशा प्रकारे प्रतिसाद देत आहे या दृष्टीनेच प्रस्तुत संशोधन कार्यात अध्ययनाद्वारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

## निष्कर्ष

- विदर्भाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सांस्कृतिक वैभव अनन्यसाधारण आहे .
- विदर्भाचे आर्थिक जीवन मुख्यता कृषी क्षैत्रावर अवलबूण आहे.
- विदर्भातील आर्थिक जीवन आणि विदर्भातील मानव संसाधन यात निश्चितच संबध आहे .
- विदर्भातील श्रमिक चळवळ स्वातत्र्य चळवळीतुन आकारस आली.
- कामगार संघटनाच्या संघर्षाचे महत्वपूर्ण पैलू लोकशाही समाजवादीची स्थापना इत्यादी दीर्घ पल्याच्या राजकीय उद्दिष्टय ठेवणाऱ्या संघटना आणि कामगार विषयक सरकारी धोरणांना कामगारानुकुल दिशा देणे, कामगार संघटनांना प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे, कामगार वर्गाचे जीवनमान उंचावणे आणि त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावणे.

## संदर्भ ग्रंथ सूची

1 डॉ. खांदेवाले श्रीनिवास, विदर्भ राज्य संकल्पना, विसा बुक्स, नागपूर.
2 डॉ. वक्कानी नि. आ., आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाषन, नागपूर.
3 प्रा. वैद्य एन. बी., विदर्भाची अर्थव्यवस्था, श्री. मंगेश प्रकाषन, नागपूर.
4 नाथे संजय, विदर्भातील जिल्हे, नाथे पब्लिकेषन नागपूर.
5 बोधनकर, डॉ. सुधीर, कानेटकर, डॉ. मेधा आर्थिक नियोजन आणि भारताचा विकास, श्री साईनाथ प्रकाषन, नागपूर.
6.डॉ. भोसले नारायण, महाराष्ट्र वार्षिकी 2008 —2009, द. युनिक अकॅडमी, पुणे.

## Websites

www.nagpuronline.com
www.maharashtragov.com
www.google.com